## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३२/२०१९ मधील नि.क्र.७५ वरील आदेश
## CNR No.MHSN020004102019
## ( संजय मोहीते वगैरे विरुध्द कुमार आवळे वगैरे )

१. अर्जदारतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २२ नियम २ व ३ प्रमाणे जाबदार क्र.१०अ चे वारस रेकॉर्डवर आणून त्याप्रमाणे दुरुस्ती करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी मुळ अर्ज, रे. दि. मु. नं. ४६१/२०१४ हा दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना जाबदार क्र.१०अ रामभाऊ उर्फ रामचंद्र नाना कांबळे हे दिनांक ०९/०३/२००५ रोजी बेथेलनगर, मिरज, जि. सांगली येथे अकस्मीकपणे राहत्या घरी मयत झालेले आहेत. जाबदार क्र.१०अ हे मयत झाल्यामुळे त्यांचे नाव कमी करुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.१०अ/१ राजकमल संजय मोहीते यांना सामील करणे गरजेचे आहे. जाबदार क्र.१०अ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास १६ वर्षे १० महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरची माहीती वेळेत मिळाली नसल्याने सदरचा विलंब झालेला आहे. अर्जदार यांनी मुद्दामहून अगर जाणीवपूर्वक विलंब केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज रे. दि. मु. नं. ४६१/२०१४ हा दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी असल्यामुळे प्रतिवादी क्र.१०अ च्या वारसांना रेकॉर्डवर घेवून अर्जामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे

३. सदरहु अर्जाला अनुषंगून जाबदार यांनी त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर दाखल केलेले आहे व त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४. उभय पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांना अनुसरुन पुढील विवाद मुद्दा

माझ्या समोर उपस्थित होतो, त्याचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारतर्फे अर्जाच्या सरनाम्यात अर्जामध्ये नमूद वारसदार यांच्या दुरुस्तीचा अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो का ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. सदर अर्जास अनुसरुन अर्जदार व जाबदार यांच्या दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. निर्विवादपणे अर्जाचे स्वरुप पाहता मुळ अर्ज हा रे. दि. मु. नं. ४६१/२०१४ हा दावा पुन्हा फैलावर घेणेसाठी असल्यामुळे जाबदार क्र.१०अ चे वारंसाना रेकॉर्ड वर घेणे व त्यांना पुराव्याची संधी मिळणे आवश्यक आहे. जर जाबदार क्र.१०अ यांच्या वारसांना रेकॉर्ड वर घेतले नाही, तर त्यांच्या विरुध्द केस अबेट होउुन सदरची केस आपोआप संपुष्टात येईल. यापूर्वी नि.क्र.७३ कडे जाबदार क्र.१०अ यांचेवरील अबेंटमेंटचा हुकूम अर्जदार यांनी १०००/– रुपये कॉस्ट भरण्याच्या पुर्वलक्षीत अटीवर रद्द करण्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यामुळे केसचा गुणदोषावर निकाल होण्याच्या दृष्टीने जाबदार क्र.१०अ च्या वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे.

७. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्जाचे कामकाज सुलभतेने करण्याच्या दृष्टीने अर्जदारचा दावा दुरस्तीचा अर्ज मंजूर केला तर जाबदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच जाबदार यांना अधिक म्हणणे देण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे

अर्जदार यांचा अर्जामध्ये दुरुस्तीचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे निष्कर्षादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा नि.क्र.७५ कडील अर्जामध्ये दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारतर्फे १५ दिवसाचे आत, अर्जामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त अर्जाची प्रत त्याच मुदतीत केसकामी दाखल करावी.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

४. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.02.17 16:29:22 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**
**दिनांक– १६.०२.२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर,<br>सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १६/०२/२०२३ |
| पी. डी. एफ/अपलोडचा दिनांक | - | १७/०२/२०२३ |